राष्ट्रनिर्माते

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर




संपादक

डॉ. डोंगरे एल.बी.

Scanned by CamScanner

राष्ट्रनिर्माते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संपादक

डॉ. डोंगरे लक्ष्मण भीमराव

शिवानी प्रकाशन, पुणे



Scanned by CamScanner

# राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संपादक - डॉ. लक्ष्मण भीमराव डोंगरे

**सर्व हक्क :**
संपादक डॉ. लक्ष्मण भीमराव डोंगरे

**प्रथम आवृत्ती :**
१ जानेवारी २०२२

**प्रकाशक**
विजय टेकवार
शिवानी प्रकाशन
माळवाडी हडपसर, पुणे

**अक्षर जुळवणी व मुखपृष्ठ**
संतोष जाधव
ओम ग्राफिक्स,
संभाजी चौक सिडको नविन नांदेड

**मुद्रण स्थळ**
आर्टी ऑफसेट, लातूर

किंमत - १९०/-
ISBN – 978-93-85426-68-1



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

१) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मुल्यगर्भ शैक्षणिक विचार 8
**डॉ अर्जुन गंगाराम नेरकर**

२) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादी आर्थिक विचार 13
**प्रा.डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे**

३) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजीक समतेचे विचार 17
**प्रा. संतोष सुखदेव ठाकरे**

४) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्तीवादी विचार 26
**प्रा.एस.पी. उमरीवाड**

५) डॉ बाबासहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना 34
**प्रा. कौसल्ये एस.जी.**

६) भारतीय राज्यघटना आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर 43
**प्रा. अर्जुन मोरे**

७) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधीचे विचार 48
**प्रा.आनेराव एम.एम.**

८) शेतकऱ्यांचे हितकरी - डॉ बाबासाहेब आंबेडकर 53
**डॉ विजयकुमार बाबळे**

९) डॉ बाबासाहेब आंडकर भारतीय संवीधानाचे शिल्पकार 57
**डॉ पी.एस.लोखंडे**

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार... 62
**प्रा. लक्ष्मण एस. पवार**

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक, 75
आर्थिक विचार - **प्रा. डॉ. मनोहर कुंडलिक थोरात**

१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार 82
**बोंबले राजू बालासाहेब**

१३) डॉ. आंबेडकरांचे सामाजिक लोकशाहीसंबंधी विचार 91
**प्रा.डॉ. माधव केरबा वाघमारे**

१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण एक विश्लेषण 95
**प्रा. डॉ. डोंगरे एल.बी.**

१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार आणि धर्मांतर 104
**डॉ. डी. के. कदम**



Scanned by CamScanner

# 1) बाबासाहेब आंबेडकरांचे मूल्यगर्भ शैक्षणिक विचार

डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर
मराठी विभाग,
म.स.गा.महाविद्यालय मालेगाव कॅम्प, मालेगाव जि.नासिक.

---

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपल्या कर्तव्याची व हक्काची जाणीव होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला सतत शिक्षणाची हाकाटी दिली.शिक्षणामुळे आपल्या जगण्यात अनेक आमूलाग्र बदल घडवू शकतो.हा प्रगल्भ विचार डोळ्यांसमोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाच्या शिक्षणासाठी **पीपल्स एज्युकेशन सोसायटीची** स्थापना करून दलित समाजाला जे शिक्षणाचे दान दिले ते क्रांतिकारी तर आहेच परंतु मागासवर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चिंतन केले तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे.दलित समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात निश्चित केले आहे.**"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे"**ते जर प्राशन केले तर मानव वाघासारखा गुरुगुरल्याशिवाय राहत नाही.१(पान नं.२२६, २२७, २२८)कनिष्ठ जातीना शिक्षणाचा अधिकार नाकारला आणि उच्च जातींना शिक्षणाचा अधिकार दिला होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कनिष्ठ जातीच्या लोकांना उपदेश करून आपल्या मुलांना शाळेत पाठवावे यासाठी प्रोत्साहित केले. त्यासाठी त्या मुलांना शिष्यवृत्ती गणवेष. भोजन व निवारा अशा सुविधा पुरविण्याचा देखील त्यांनी प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना **"शिका, संघटित व्हा आणि संघर्ष"**२(२२९)करा असा संदेश दिला.ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते तसेच एखादी व्यक्ती वा समूहाला शिक्षण नाकारले म्हणजे माणूस म्हणून त्यांचे अस्तित्व नाकारून त्यांच्या क्षमता मारून टाकणे होय.शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना . डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास प्रकरणी बोलतांना म्हणतात की," हिंदूसमाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे मी



Scanned by CamScanner

जाणतो.खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते पण हे चूक आहे. कारण हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा यांची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करण्यास भाग पाडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागते. त्यामुळे त्यांच्या मनात होणारा न्यूनगंड नाहीसा करणे हे खरे शिक्षणाचे ध्येय आहे." अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. याशिवाय माणूस जगू शकत नाही. त्याच प्रमाणे शिक्षणाशिवाय माणसाचा कोणत्याही प्रकारचा विकास होऊ शकत नाही. शिक्षण हे माणसाला विचार करायला लावते, त्यांच्या बुद्धीची जोपासना करते. त्यांच्या अस्तित्वाची त्याला जाणीव करून देते. आपल्या अस्तित्वाची जाणीव हीच खरी मानवाच्या जीवनातील मूलभूत गरज आहे. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की,"उपासमारीने शरीराचे शोषण कमी झाल्यास मनुष्य हतबल होऊन अल्पायुषी होतो तर शिक्षणाच्या अभावाने तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो."आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच एकमेव औषध आहे तात्पर्य बाबासाहेबांना उच्च शिक्षणाद्वारे समता स्वातंत्र्य बंधुभावही मानवी मुल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता बाबासाहेबांच्या शैक्षणिक चळवळीचा हाच खरा मूलाधार होता.

शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास साधण्याचे एक माध्यम आहे. सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे व आर्थिक विकास साधून राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्याचे ते एक शास्त्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलितांच्या शिक्षणाविषयीची खूप तळमळ होती. या तळमळीतून दलित समाजातील व्यक्तींना शिक्षण मिळाले पाहिजे. प्रत्येक माणसाने शिक्षण घेतले पाहिजे कारण त्यातूनच त्याचा बौद्धिक व मानसिक विकास साधला जातो. याविषयी आपले विचार व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात,"शाळेमध्ये जर नुसत्या बाराखड्या शिकवायच्या असत्या तर ती गोष्ट निराळी, पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करून त्यांना समाज हितायोग्य वळण लावायचे असते. शाळा म्हणजे उत्तम नागरिक निर्माण करण्याचे कारखाने आहेत."३ शिक्षण हे केवळ सामाजिक उन्नतीचे साधन आहे असे नाही तर शिक्षणाला सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे एक साधन मानतात. शिक्षणापासून वंचितांना शिक्षण उपलब्ध



Scanned by CamScanner

करून शिक्षणातून सामाजिक गुलामगिरी नष्ट करून ते समाजामध्ये क्रांती घडवू पाहतात. भारतीय शिक्षण पद्धतीत त्यांना कधीच समाधान नव्हते याचे एकमेव कारण म्हणजे प्राचीन काळापासून शिक्षण पद्धतीने चालत आलेली विषमता होय. समाजामध्ये बुद्धांनी सांगितलेली स्वातंत्र्य समता आणि बंधुता अमलात आणणे फार गरजेचे आहे म्हणूनच ते म्हणतात." गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो आपोआप बंड करून उठेल."४ याचाच अर्थ असा की शिक्षणातून व्यक्तीला आत्मज्ञान प्राप्त होते म्हणजेच शिक्षणामध्ये आत्मज्ञान प्राप्त करून देण्याची व परिवर्तन घडून देण्याची शक्ती आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकट्या बहुजन जातीचाच विचार न करता सर्वसामान्य माणसाचा विचार करून प्रत्येकाला शिक्षण ही सहज अवगत झाले पाहिजे. त्यातच संपूर्ण भारतीय स्त्री यांचाही विचार त्यांनी केलेला दिसतो. स्त्रियांना शिक्षण देणे ही काळाची गरज आहे.स्त्रीयांना शिक्षण देणे म्हणजे त्यांचा सन्मान करणे होय.स्त्रीयांचा जिथे सन्मान केला जातो तिथे देवदेवतांचा वास असतो.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या उन्नतीचा मार्ग म्हणजे शिक्षण होय. ज्ञान आणि विद्या या दोन गोष्टी पुरुषांबरोबरच स्त्रियांनाही त्या मिळाल्या पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन होता." जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाचा उद्धार करी." एका पुरुषाला साक्षर केले तर एक व्यक्ती सुधारेल पण एका स्त्रीला साक्षर केले तर सारं कुटुंब सुधारेल. ज्या समाजातील स्त्रिया जास्तीत जास्त संख्येने शिकलेल्या असतील तो समाज पुढारलेला असेल म्हणून स्त्रियांच्या शिक्षणावर अधिक भर द्यावा. असे विचार डॉ. बाबासाहेबांनी आपल्या वडिलांच्या मित्रांना पाठवलेल्या पत्रात लिहिले होते. याचा अर्थ समाजाची, व्यक्तीची व देशाची प्रगती ही येथील शिक्षण प्रणालीवर अवलंबून आहे याची पदोपदी जाणीव करून दिली आहे. म्हणजेच शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे साधन आहे.१९३० मध्ये नागपूर येथे भरलेल्या भारतीय दलित कॉंग्रेसचे आयोजन होते त्या प्रसंगीडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भाषणात, दलितांच्या राजकीय हक्काचा व त्यांच्या परीवर्तना करिता राजकीय सत्ता प्राप्त केली पाहिजे व ते प्राप्त करण्यासाठी उच्च व उच्चतम शिक्षणाच्या माध्यमाने ते प्राप्त केले जाऊ शकते असे प्रखड विचार बाबासाहेबांनी मांडले होते.



Scanned by CamScanner

लोकशाही, समाजवाद आणि बुद्ध विचारप्रणाली हाच आंबेडकरी विचारांचा गाभा आहे. दलित साहित्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान मोठ्या प्रमाणात येते. समाजसुधारणा म्हणजे अस्पृश्यता नष्ट झाली असे होत नाही. केवळ समाज बदलून चालणार नाही. भौतिक सुख मिळाले म्हणजे सर्वकष परिवर्तन झाले असे होत नाही. त्यासाठी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व मानसिक स्तरावर परिवर्तन घडवून येणे आवश्यक आहे. या सर्व परिवर्तनासाठी शिक्षणाची नितांत गरज आहे. बाबासाहेबांनी शिक्षणाचा पायाभूत विचार करताना ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही त्यांच्यासाठी सक्तीचा कायदा असावा असेही नमूद केले आहे. त्याच बरोबर शिक्षण सर्वांसाठी सरसकट मोफत न करता ज्यांच्याकडून फी मिळेल ती घ्यावी म्हणजे मोफत शिक्षण घेणाऱ्यांना त्याचा लाभ देता येईल असे प्रेरणादायी विचार बाबासाहेबांनी व्यक्त केले आहेत.

शिक्षणाविषयी विचार व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब म्हणतात. "शिक्षणाने मनुष्यत्व येते आणि पशुत्व हटते. यासाठी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाविषयीची मोलाचे कार्य केले. शिक्षणाने माणूस बनवण्याची प्रक्रिया पूर्ण होते. विवेकी माणूस. विचारी माणूस देशाचा विकास प्रक्रियेत आपले योगदान देत असतो. म्हणून शासनाने शिक्षणाला उत्तेजन दिले. या फुले दाम्पत्याने शिक्षणाचा ध्यास घेऊन सामान्य माणूस अज्ञान. विषमता, अन्याय, दास्य यातून मुक्त झाला पाहिजे असा घेतलेला वसा आणि समता, न्याय, स्वातंत्र्य या मानवी मूल्यांचा वारसा निर्माण करायचा होता. शिक्षण म्हणजे संम्यक परिवर्तन, हेच क्रांतीचे सूत्र आहे. समता, स्वातंत्र्य,बंधुता आणि सामाजिक न्यायावर अधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी शिक्षण हेच महत्त्वाचे आहे. असे मूलगामी विचार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले आहेत.

राष्ट्राच्या प्रगतीचा पाया शिक्षण असल्याने प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार ही शासनाची जबाबदारी आहे. देशाच्या जीवनकलहात निरक्षर माणसाचा निभाव लागणार नाही, म्हणून लोकांनी निरक्षरता हद्दपार केली पाहिजे. हे काम करण्यास शासन नेहमीच टाळाटाळ करते. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुभवले होते. शिक्षणक्षेत्राची स्वायत्तता, स्वतंत्रता आणि प्रतिष्ठा त्यांना महत्त्वाची वाटत होती. शिक्षणानेच समाजात समता येईल. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या मुला-मुलींना शिक्षण दिले पाहिजे. अशा स्वरूपाचे प्रखर विचार



Scanned by CamScanner

बाबासाहेबांनी केले आहेत. तर त्या दिशेने वाटचाल करून सत्यात उतरविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.स्त्री-पुरुषांना वेगवेगळे ठेवल्याने त्यांची नीतिमत्ता शाबूत राहते. हा निव्वळ भ्रम आहे.स्त्री-पुरुषांनी एकत्र राहूनच शिक्षण घेतले पाहिजेहाच खरा स्त्री-पुरुष समतेचा मूलमंत्र आहे.

एकंदरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य महत्त्वाचे आहे.खरं तर देशाचा विकास साधायचा असेल,स्वातंत्र्य-समता-बंधुता-सामाजिक न्यायावर आधारलेला उन्नत समाज उभा करायचा असेल, निकोप लोकशाही आणायची असेल. विषमता गाडण्याची मनापासून इच्छा असेल तर शिक्षणाचा संमेक विचार देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांचे नेते आहेत.हे सर्व शिक्षितांनी समजून घ्यावे लागेल. शिक्षितांच्या मस्तकातील जातीचा वळवळणारा किडा मेला पाहिजे. पण झाले उलटेच. शिक्षणाने जाती अहंकार अधिक टोकदार झाले आहेत. समाजाचे स्वास्थ्य या जाती अहंकाराने नसून टाकले. शिक्षणातून अधिक व्यापक भूमिका तयार झाली. जातीपातीच्या पलीकडे जगायला शिकले, तरच आपले भले होईल याचे भान आता यायला हवे. तरच आपला विनाश थांबेल असे विचार व्यक्त करून शिक्षणाविषयी धोरणाची नियमावली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार करून दिली आहे.

**संदर्भ.**


१. दलितेतरांसाठीडॉ.बाबासाहेब आंबेडकर अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा – डॉ. प्रल्हाद लुलेकर- सायन पब्लिकेशन प्रा.लि.

२. शोधगंगा –शोधनिबंध.

३. दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील अग्रलेख.

४. विकिपीडिया संपादन.





Scanned by CamScanner